Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)

Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India

Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/

ISSN (Online): 2583-8423

Volume 1, Issue 5, December 2023; Pages 144 – 147

DOI: 10.5281/zenodo.10072946

Original Research Article

# महात्मा गांधी आणि ग्रामीण स्वराज्य

प्रा. डॉ. सुरेश चंद्रकांत मेहेत्रे[1], प्रा. डॉ. विजय नागोराव भोपाळे[2]

[1]प्राध्यापक आणि अर्थशास्त्र विभाग प्रमुख, बी. रघुनाथ महाविद्यालय, परभणी ४३१४०१ महाराष्ट्र, भारत

[2]प्राध्यापक आणि अर्थशास्त्र विभाग प्रमुख, स्वा. सै. सूर्यभानजी पवार महाविद्यालय, पूर्णा (जं.) जि. परभणी ४३१५११ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: [1]mehetresuresh@gmail.com; [2]vijaybhopale9@gmail.com

Received: 13 October, 2023 | Accepted: 27 October, 2023 | Published: 28 October, 2023

**गोषवारा**

मागील तीन ते चार वर्षात संपूर्ण विश्वाला ज्या कोरोनाच्या महामारीने ग्रासले होते त्याचा परिणाम हा केवळ सामाजिक, राजकीय आणि आर्थिक बाबीवरच झाला नाही तर संपूर्ण अर्थव्यवस्थेला देखील व्यापले आहे. याच दरम्यान संपूर्ण जगाला कळून चुकले की आत्मनिर्भर असणे आवश्यक आहे. त्यासाठी स्वावलंबन आणि स्वदेशीचा मोठा वापर होणे आवश्यक आहे असे संपूर्ण जगाला वाटू लागले. सोबतच स्थानिक उत्पादन, स्थानिक बाजारपेठ, स्थानिक संबंध यांची साखळी मजबूत असणे आवश्यक आहे याची आवश्यकता निर्माण झाली. याचाच अर्थ असा की, कोरोना सारख्या संकटाने उपस्थित झालेल्या परिस्थितीने संपूर्ण जगाला कळून चुकले की, महात्मा गांधींच्या 'ग्रामीण स्वराज्य' या संकल्पनेचा गंभीरतेने विचार करायला हवा. महात्मा गांधींनी फार पूर्वीच सांगितले होते की, "भारतीय स्वातंत्र्याचा अर्थ पूर्ण भारताची स्वतंत्रता असावी आणि याची सुरुवात खालून वरती म्हणजे खेड्यातून शहराकडे व्हावी. प्रत्येक गांव स्वतंत्र असेल. प्रत्येक गांव आत्मनिर्भर आणि सक्षम व्हावे." महात्मा गांधींनी आपल्या या स्वप्नाला साकार करण्यासाठी भारतात ग्राम पंचायती आणि ग्रामसभा या स्थानिक विकास आणि स्थानिक प्रशासन यांचा मुख्य आधार असायला हवे असे मत प्रतिपादन केले होते.

**सुचनक शब्द:** ग्राम स्वराज्य, ग्रामीण विकास, समानता.

**प्रास्ताविक**

भारतीय अर्थव्यवस्था ही कृषीप्रधान अर्थव्यवस्था म्हणून ओळखली जाते. कारण भारतातील बहुतांशी लोकांची उपजीविका ही कृषीवर आधारित आहे. म्हणूनच महात्मा गांधींना वाटत होते की, भारताच्या ग्रामीण भागाला पूर्वीचे वैभव प्राप्त व्हावे. यासाठी त्यांना ग्राम स्वराज्याची संकल्पना सुचली होती. ग्रामीण भागातील जनता स्वयंपूर्ण बनली पाहिजे आणि त्यांच्या पूर्ण गरजा या खेड्यातच भागल्या पाहिजेत हा ग्राम स्वराज्य संकल्पने मागचा उद्देश होता. शेती सुधारणेकडे आधी लक्ष केंद्रित होण्यासाठी महात्मा गांधींनी राज्याच्या आर्थिक, सामाजिक आणि राजकीय शक्ती साकारता येतील अशी ग्राम स्वराज्याची संकल्पना मांडली. ग्राम स्वराज्याची ही संकल्पना मुलभूत आणि सर्वस्पर्शी अशी आहे. भारतात पदार्पण केल्यापासूनच महात्मा गांधींनी या ना त्या रीतीने ग्राम स्वराज्याचा पाठपुरावा केला, धर्म, निती, राजकारण, अर्थकारण, शिक्षण, आरोग्य, शेती, कायदा या विषयी विचार मांडतानाच महात्मा गांधीनी ग्राम स्वराज्याविषयी वेळोवेळी विधायक स्वरूपाचे विचार मांडले. या अनुषंगाने महात्मा गांधी आणि ग्रामीण स्वराज्य या विषयाचा शोध आणि बोध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**उद्दिष्ट्ये**

१. महात्मा गांधींच्या ग्रामीण स्वराज्य संकल्पनेचा अभ्यास करणे.
२. महात्मा गांधींच्या विचारातील तत्त्वांचा अभ्यास करणे.
३. आधुनिक भारतात ग्राम स्वराज्य संकल्पना कशी लागू होईल याचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती**

महात्मा गांधी आणि ग्रामीण स्वराज्य याविषयी संशोधन करत असताना प्रामुख्याने उद्दिष्ट्याना अनुसरून गुणात्मक आणि विश्लेषणात्मक माहिती असणे आवश्यक आहे. जेणेकरून संशोधन परिपूर्ण आणि उत्कृष्ट होईल. त्यासाठी द्वितीयक सामग्रीचा आधार घेतलेला आहे. यामध्ये प्रामुख्याने पुस्तके, मासिके, साप्ताहिके, लेख, वार्षिकांक इत्यादींचा वापर करण्यात आला आहे. अधिक तंतोतंत माहिती मिळविण्यासाठी इंटरनेट, वेबसाईट यांचा वापर करण्यात आला आहे.

**महात्मा गांधी आणि ग्रामीण स्वराज्य**

आधुनिक काळामध्ये आपण पाहतो की, खेड्यांची दुरावस्था झालेली आहे. तुलनात्मकदृष्ट्या प्राचीन काळातील स्थिती अधिक चांगली होती. तेथील लोकांचे जीवन सुखी आणि समृध्द होते. प्रत्येक खेड्याने स्वतःची अशी मजबूत व्यवस्था बनवून ती खेडे स्वावलंबी जीवन जगत होते. गांधींनी या काळाला ग्राम गणराज्यांचा सुवर्णकाळ मानले होते. परंतु भारतात ब्रिटीशांच्या आगमनानंतर पाश्चिमात्तीकरणास सुरुवात झाली. ब्रिटिशांनी उभारलेल्या शहरांनी ग्रामीण भागातील खेड्यांचे शोषण करून खेड्यांना परावलंबी बनवले. म्हणून गांधीजी म्हणत असत जोपर्यंत भारतातील खेड्यांचा विकास होणार नाही तोपर्यंत भारताचा विकास होणार नाही.

महात्मा गांधीजीनी आपले स्वतंत्र अर्थविषयक विचार मांडताना ग्राम स्वराज्य आणि स्वावलंबन याला पाया मानले. ज्याठिकाणी स्वावलंबी समाज असेल आणि आपल्या उपजीविकेसाठी दुसऱ्यावर अवलंबून राहणार नाही तर तो परस्परांच्या सहकार्याने काम करेल. या स्वयंपूर्णतेमध्ये गांधीजींना अन्न, वस्त्र, निवारा याबाबतीत स्वयंपूर्णता अपेक्षित होती. 'ग्राम स्वराज्य म्हणजे आदर्श खेडे होय'. १९३७ साली गांधीजींनी 'हरिजन' या वर्तमानपत्रातून आदर्श खेड्यांची संकल्पना मांडली होती.

**ग्रामीण स्वराज्य संकल्पनेत प्रामुख्याने खालील बाबींचा समावेश असणे गांधीजींना अपेक्षित होते.**

१. गावातील लोकांना निरोगी आणि स्वच्छ हवा, आरोग्य मिळावे, गावातील गरजा गावातच भागविण्यासाठी ग्रामीण उद्योगांची उपलब्धता, मोकळया घरांची उपलब्धता हवी होती. शेती, पशु संगोपन, पाणी पुरवठा व्यवस्था, सर्वधर्मीय प्रार्थना स्थळे, मंदिरे सहकारी स्वरूपाची गोशाला, प्राथमिक व माध्यमिक शिक्षणासाठी शाळांची उत्तम व्यवस्था, त्या शाळांमध्ये नैतिक आणि औद्योगिक शिक्षण दिले जाईल. गावातील प्रश्न गावातच सोडविण्यासाठी पंचायतीची स्थापना अपेक्षित होती.

२. पारंपारिक राजकीय पद्धतीची व्यवस्था ग्रामस्थांच्या माध्यमातून पुनरुज्जीवित करण्यासाठी ग्राम पंचायत, ग्राम सभा इ. बाबींचा स्वीकार करून त्याला जोडून भारतातील खेडी समृद्ध होण्यासाठी औद्योगीकरणाच्या धर्तीवर ग्रामोद्योग, कुटिरोद्योग यांना चालना देवून ग्रामीण विकास साध्य करणे त्यांच्या विचारात होते.

३. महात्मा गांधींनी ग्रामीण विकासासाठी 'ग्राम दान' संकल्पना विकसीत केली होती. ग्राम दान म्हणजे प्रत्येक खेड्यातील शेतकऱ्याने आपल्या ताब्यातील जास्तीची जमीन ही गावास दान करावी त्यामुळे शेती ही सर्व गावाचीच असेल. आपल्या हिंद स्वराज्य या पुस्तकात आदर्श अशा ग्राम उद्योगप्रधान भारताची कल्पना गांधींनी विस्तृत केली होती. त्यात त्यांनी असे सुचविले होते की, "ग्राम हा स्वावलंबी व आत्मनिर्भर असा राष्ट्राचा एक महत्त्वपूर्ण भाग असेल."

४. आपल्या खेड्याच्या आणि त्यानुषंगाने देशाच्या समृद्धीसाठी कृषी आणि ग्रामोद्योगाच्या विकासाचे महत्त्व पटवून देताना गांधीजींना खादीची संकल्पना मांडली. त्यासाठी त्यांनी चरख्याना 'जीवदाता सूर्य' असे संबोधले होते. हस्तकला, कारागिरी, बलुतेदारी, लघु आणि कुटीरोद्योगांना प्रोत्साहन देवून ग्रामपातळीवरील शोषण थांबवले तर गावातील संपत्ती गावातच राहील आणि गांव समृध्द होईल हे गांधीजीनी ओळखले होते. ग्रामीण स्वराज्य हे आपल्या देशाची मोठी आवश्यकता आहे आणि जोपर्यंत खेडी स्वावलंबी होणार नाहीत तोपर्यंत राष्ट्राच्या स्वातंत्र्याला अर्थ उरणार नाही असे गांधीजींचे स्पष्ट मत होते.

५. गांधीजींचा भर सुरुवातीपासूनच राजकीय आणि आर्थिक बाबतीत विकेंद्रीकरणावर होता. कारण विकेंद्रीकरण हा गांधीजींच्या ग्राम स्वराज्याचा मूलमंत्र होता. उत्पादन साधनांच्या केंद्रीकरणामुळे आर्थिक विषमता निर्माण होते म्हणूनच गांधीजींना उद्योगांचे केंद्रीकरण नको होते. यासोबतच त्यांनी हस्त व्यवसाय आणि कुटीरोद्योगांना आपल्या ग्रामीण स्वराज्याच्या संकल्पनेत महत्त्वाचे स्थान दिले. कारण हे उद्योग परदेशात जाणारा पैसा बंद करतात, परिणामी ग्रामीण भागातील बेकारी कमी होते आणि दारिद्र्य नष्ट होण्याला मदत होते.

६. गांधीजींना आपल्या ग्रामीण स्वराज्यामध्ये जी शिक्षण व्यवस्था अपेक्षित होती ती सक्तीचे प्राथमिक शिक्षण आणि विनामुल्य हवे होते. विद्यार्थ्यांना देण्यात येणारे शिक्षण हे अहिंसात्मक समाजव्यवस्था निर्माण करण्याचे ध्येय समोर ठेवून देण्यात यावे असे अपेक्षित होते. त्याबरोबरच शारीरिक श्रमाचे महत्त्व पटवून देणारे शिक्षण त्यांना ग्राम स्वराज्यात अपेक्षित होते. व्यवसायाभिमुख आणि कृतीशील शिक्षणाला त्यांनी अधिक महत्त्व दिले. कारण ग्राम व्यवसाय शिक्षण मिळाल्याने व्यक्ती स्वतःच्या पायावर उभा राहून स्वावलंबी बनू शकतो असे गांधीजींचे मत होते.

**निष्कर्ष**

एकंदरीत विचार केला तर महात्मा गांधीजींच्या ग्राम स्वराज्य संकल्पनेत एक शोषण विरहीत, आर्थिक आणि सामाजिक समानतेवर आधारित समाज साकारण्यासाठी त्यांनी विश्वस्त संकल्पना मांडली. यामध्ये राजकीय आणि सामाजिक विकासाबरोबरच आर्थिक विकासासाठी उत्पन्नाचे समन्यायी वाटप व्हावे याकरिता आर्थिक विकेंद्रिकरणाची आवश्यकता महात्मा गांधींनी आपल्या ग्रामीण स्वराज्य या संकल्पनेत मांडली असल्याचे दिसून येते. व्यक्ती विकासाला केंद्रबिंदू मानून गावाच्या विकासात व्यक्तीला प्राधान्य द्यावे असे गांधीजींचे स्पष्ट मत असल्याचे दिसते. महात्मा गांधींची ग्रामीण स्वराज्य संकल्पना व्यक्तीच्या श्रमाला प्राध्यान्य देणारी आणि खेड्यांना स्वावलंबी बनवण्यासाठी सहाय्यक आहे. खेड्यामध्ये प्रत्येकाच्या गरजा पूर्ण झालेल्या पाहिजेत. ग्रामीण आणि शहरी भागात समतेची बीजे रुजविण्याचा प्रयत्न ग्रामीण स्वराज्य या संकल्पनेतून केला गेला. खेड्याच्या विकासासाठी ग्राम पंचायतींना दिलेले अधिकार, देशामध्ये अलीकडील काळात सत्तेच्या विकेंद्रीकरणावर दिला जाणारा भर, यामुळे ग्राम पंचायतीचे व ग्रामसभेचे वाढते महत्त्व पाहून गांधीजींचे विचार प्रत्यक्षात उतरल्याची जाणीव होते. महात्मा गांधींनी ग्रामीण स्वराज्याची संकल्पना जरी नैतिकतेच्या दृष्टीकोनातून मांडलेली असली तरी त्याची आवश्यकता आपल्या देशातील लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी आवश्यक आहे. ग्रामीण स्वराज्याच्या संकल्पनेला भारतामध्ये सर्वप्रथम गांधीजींनीच जनसामान्याचा आणि लोकशाहीचा संदर्भ प्राप्त करून दिला.

अशाप्रकारे महात्मा गांधींनी आपल्या विविध सामाजिक विचारांच्या माध्यमातून देशामध्ये स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता अशा मानवी मुल्यांची जोपासना करून ग्रामीण जनतेच्या कल्याणासाठी प्रयत्नांची पराकाष्टा केली. ग्रामीण स्वराज्यामध्ये सर्व भरतीय समाज सुजलाम सुफलाम झाला पाहिजे अशी महात्मा गांधींची धारणा होती. ग्रामीण स्वराज्याच्या माध्यमातून खेड्यांचा सर्वांगीण विकास झाला पाहिजे म्हणून त्यांनी ग्रामीण जीवनाच्या विविध पैलूंवर आपले विचार मांडले. म्हणजेच खेड्यांच्या विकासासाठी त्यांनी ग्रामीण स्वराज्याची संकल्पना मांडली. एकूणच ग्रामीण लोकांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि उत्कर्षासाठी आजच्या काळात सुद्धा ग्राम स्वराज्याची संकल्पना फार महत्त्वाची आहे.

**संदर्भ सूची**

१. हरिप्रसाद व्यास : महात्मा गांधी ग्राम स्वराज्य : नवजीवन प्रकाशन मंदिर, अहमदाबाद

२. अनिल मिश्र : गांधी के विचार : प्रभात प्रकाशन नई दिल्ली

३. खान इक्बाल : 'पंचायती राज एवं ग्रामीण विकास योजना' : रितू पब्लिकेशन, जयपूर, 2004

४. भाऊ धर्माधिकारी : 'गांधी विचार दर्शन-राजकारण' : खंड-1 म. गा. स्मारक निधी प्रकाशन, पुणे 1995

५. बाळासाहेब भारदे : 'गांधी विचार दर्शन-ग्राम स्वराज'- पृथ्वीराज प्रकाशन, पुणे-1995

६. शि. गा. भावे : महात्मा गांधी संकल्पित वाड.मय, संचालक प्रसिद्धी विभाग महा. खंड-14

७. डॉ. भा. ल. भोळे : भारतीय राजकीय विचारवंत : विद्या बुक्स, औरंगाबाद

८. https://www.esakal.com